दुरध्वनी क्र.02162-234076/234077
Email-sataramunicipal@gmail.com

# फेर ई निविदा सुचना सन 2023-2024 ( ऑनलाईन)

**मुख्याधिकारी, सातारा** नगरपरिषद, सातारा 415001 दुरध्वनी क्र.02162-234076/234077 प्रादेशिक परिवहन विभागाकडे नोंदणीकृत वाहन पुरवठा धारकांमार्फत खालील वार्षिक कामाकरिता नमुन्यातील ई-निविदा प्रणाली द्वारे (ऑनलाईन) मजूर पुरवठादार संस्था मार्फत फेर-२ **ई निविदा** मागविणेत येत आहे.

| **ई-नविदा काम क्रमांक** | **कामाचे नांव** | **कामाचा कालावधी** | **इसारा/बयाणा रक्कम** | **ई-निविदा संचाची किंमत** |
|---|---|---|---|---|
| 1 | सातारा नगरपरिषदेच्या वाहतुक विभागासाठी ६ प्रवाशी क्षमतेचे व ४ प्रवाशी क्षमतेचे अशा दोन प्रकारचा वाहतुक परवाना प्राप्त वाहन सेवा पुरविण्याचे **प्रति दिन** दर मागविण्यात येत आहेत. | १ वर्षे | 30000/- | 2000+18%GST=2360 |

## फेर ई निविदा वेळाप्रत्रक

| | | |
|---|---|---|
| 1 | निविदा ऑनलाईन डाऊनलोड करण्याचा कालावधी (निविदा विक्री) | दिनांक 22/12/2023 |
| 2 | निविदाकारांनी ऑनलाईन निविदा सादर करण्याचाअतिम दिनांक (तांत्रिक व आर्थिक निविदा दिनांक वेळ ) | दिनांक 28/12/2023 रोजी वेळ सायंकाळी 5=00 वाजेपर्यंत. |
| 3 | तांत्रिक व आर्थिक देकार उघडण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ | मा.मुख्याधिकारी,सातारा नगरपरिषद,सातारा यांचे कार्यालयात दि. 01/01/2024 रोजी सकाळी 11=00 नंतर ऑन लाईन निविदा उघडण्यात येतील.(शक्य झाल्यास) |

(अभिजीत बापट)
मुख्याधिकारी ,
सातारा नगरपरिषद,सातारा

# अटी व शर्ती

**1) तांत्रिक बोलीचा लिफाफा क्र. 1**

i. बयाणा रक्कम जमा केलेची पावती
ii. पॅनकार्ड
iii. GST नोंदणी प्रमाणपत्र
iv. वाहनाचा विमा
v. वाहनाची पी.यु.सी
vi. वाहनाचे आर.सी.बुक
vii. संविदेमध्ये पदाधिका-यांचे सहभाग नसलेबाबतचे स्वयंघोषणापत्र

**2) वित्तीय बोलीचा लिफाफा क्र. 2**

नमुद करणेत आलेले दर सर्व करासह व सर्व खर्चासह असावे. शर्त दरपत्रक सादर करु नये. लिफाफा क्र. 1 फोडून त्यामधील कागदपत्रांची तपासणी करुन आवश्यक ते कागदपत्रे असलेनंतरच लिफाफा नं. 2 फोडणेत येईल. अन्यथा निविदेचा विचार केला जाणार नाही.

1. सर्व पात्र/इच्छुक निविदा धारकांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रीयेत भाग घेणेकरीता ई निविदा प्रणालीच्या Main Portal – http://mahatenders.gov.in साईटवर enrol करणे आवश्यक आहे.
2. निविदाधारकाने बयाणा रक्कम ऑनलाईन पध्दतीने भरावी.
3. निविदाधारकांना वर नमुद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकवर संपर्क साधावा. टोल फ्री क्रमांक (24 x 7) 180030702231/8007211403
4. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार मुख्याधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.
5. याबाबत सदरचे कामाचा कालावधी कार्यादेश दिल्यापासुन 1 वर्षे राहील व काम समाधानकारक असल्यास पुढील वर्षाकरीता मुदतवाढ देता येईल. याबाबत सर्वसाधारण सभेचा निर्णय अंतिम असेल.
6. सदरच्या कामाबाबत माहिती कार्यालयीन वेळेत वाहतुक विभागामध्ये उपलब्ध आहे.
7. निविदा भरलेनंतर व कार्यादेश दिलेनंतर काम नाकारणेबाबतचा पत्रव्यवहार मक्तेदारास करता येणार नाही. सदर प्रकरणी दंडात्मक कारवाई करण्यात येईल.
8. मक्तेदाराने ज्या कामासाठी ऑनलाईन पैसे भरलेले आहेत त्या बयाणा रकमेच्या पावतीवर त्याचे अथवा फर्मचे नाव सही व शिक्का करुन ती पावती ऑनलाईन अपलोड करावी.

9. निविदाधारकाने निविदा दर भरत असताना वाहन चालक व इंधनासह प्रती दिन प्रमाणे दर भरावेत. ( GST वगळून )

10. निविदेसोबत प्रादेशिक परिवहन विभागाचा परवाना सादर करणे आवश्यक राहील.

11. वाहनाची नियमित देखभाल दुरुस्ती निविदाधारकाने स्व:खर्चाने करावयाची आहे.

12. निविदेसोबत वाहनाचे आर.सी.बुक, इन्शूरन्स सादर करावे.

13. वाहन पुरवठा करताना वाहनाची नोंदणी मागील पाच वर्षातील असणे आवश्यक आहे. त्यापूर्वीचे वाहन स्विकारले जाणार नाही.

14. निविदाधारकाने निविदेसोबत Income Tax Registration, Pan Card, GST Registration प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

15. सदर कामाबाबत संबंधित नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध किंवा भागीदारी नगसलेबाबत सोबतच्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक राहील.

16. निविदाधारकांनी निविदेतील सर्व दस्तऐवज Scan करुन ऑनलाईन ई-निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या वेळापत्रकानुसार अपलोड करणे अनिवार्य राहील. Technical Bid मधील कागदपत्रे हार्ड कॉपी मध्ये सादर करणे तुरंत आवश्यक राहील.

17. पहिल्या निविदेवेळेस किमान 3 निविदा धारकांनी लिफाफा क्र.1 मधील आवश्यक कागदपत्रांची पुर्तता होत नसल्यास लिफाफा क्र. 2 उघडण्यात येणार नाही.

18. निविदेसोबत बयाणा रक्कम न भरल्यास किंवा सादर न केलेल्या कोणत्याही कागदपत्रामध्ये खरेपणा आढळुन न आल्यास, भ्रष्ट किंवा कपट मार्गाचा अवलंब केल्यास, सर्शत निविदा सादर केल्यास अशा स्वरुपाच्या निविदा फेटाळल्या जातील.

19. निविदा दर 1 वर्षाकरीता ग्राह्य धरले जातात. तसेच याकामी पुढील ई-निविदा होईपर्यत आवश्यकतेनुसार मंजूर निविदाधारकास मुदतवाढ देता येईल.

20. शासन नियमाप्रमाणे मक्तेदाराच्या देयकावर GST नगरपरिषदेमार्फत अदा करणेत येईल.

21. कोणत्याही परिस्थितीमध्ये कोणत्याही अभिकर्त्याच्या या निविदेमधील कोणत्याही बाबीसाठी वाढीव दर मागण्याचा हक्क असणार नाही.

22. नगरपरिषदेच्या पूर्व मंजुरी शिवाय कामावर सब कॉन्ट्रॅक्टर नेमता येणार नाही. कामावर सब कॉन्ट्रॅक्टर आढळ्यास अभिकर्त्यावर आवश्यक ती कारवाई करण्यात येईल.

23. केंद्र व राज्य शासनाच्या नियमाप्रमाणे योग्य ते कर प्रचलित दरानूसार होणा-या बिलातुन कपात करणेत येतील.

24. प्रत्येक महिन्याची देयकाची रक्कम नगरपरिषदेकडील योग्य उपलब्ध निधीनुसार अदा करण्यात येईल.

25.वरील कामाबाबत कोणताही वाद निर्माण झाल्यास तो सातारा नगरपरिषद ज्या न्यायालयाच्या कक्षेत येते त्या न्यायालयात चालेल.

26.प्रति दिन दर सर्व करासहीत देण्याचे आहे.

27.आदेश दिल्यानंतर वाहन उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

28.व्यावसायिक वाहने चालविण्याकरीता आवश्यक परवाने, वाहनचालकाचा परवाना, लागू असलेल्या करांचा भरणा लेलेल्या पावत्या, उतरविण्यात आलेल्या विम्याची कागदपत्रे वाहनामध्ये उपलब्ध असली पाहिजेत.

29.शासकीय कामानिमित्त बाहेर गावी गेल्यास होणा-या टोलची रक्कम भरण्याची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहील.

30.मुक्काम झाल्यास त्याकरीता कोणताही अतिरिक्त भत्ता दिला जाणार नाही. तसेच वाहन चालकाची राहण्याची/निवासाची/भोजनाची व्यवस्था नगरपरिषदेकडून केली जाणार नाही.

31.वाहन चालकाजवळ वाहन चालविण्याचा अद्यावत परवाना असावा.

32.वाहनाचा पुर्ण विमा खर्च स्व:खर्चाने करावा.

33.वाहनाचे लॉगबुक ठेवण्यात यावे. त्यावरुन धावसंख्या मोजण्यात येईल व त्यानुसार मंजूर झालेल्या दराप्रमाणे प्रति दिन भाडे अदा केले जाईल.

34.वाहन कर्तव्यावर असताना अपघात झाल्यास व वाहनातील प्रवाशांना इजा किंवा दुखापत झाल्यास त्या अनुषंगाने होणारा सर्व खर्च मक्तेदारास करावा लागेल.

35.वाहनाचा डिझेल ऑॅईलवरील होणारा खर्च तसेच वाहनांची अल्प व मोठी दुरुस्ती चालकाचा पगार इ. खर्च मक्तेदाराला करावा लागेल.

36.वाहन कर्तव्यावर असताना नादुरुस्त झाल्यास त्वरीत बदली वाहन पुरविणेची जबाबदारी मक्तेदाराची राहील.

37.निविदाधारकाच्या बाबतीत नगरपरिषदेकडे प्राप्त होणा-या तक्रारींची दखल घेणे व तक्रारींचा निपटारा करणे मक्तेदार यांचेवर बंधनकारक राहील.

38.अनामत रकमेचे प्रदान सदर कामाचे स्थानिक निधी लेखापरिक्षण कार्यालयाकडून लेखापरिक्षण झालेनंतर करण्यात येईल. परंतु सदर कालावधी जास्तीत जास्त 3 वर्षे असेल.

(अभिजीत बापट)
मुख्याधिकारी
सातारा नगरपरिषद, सातारा